<u>प्रेसनोट</u>

दि.०७/०९/२०२२

# चाकण वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथील पोलीस अंमलदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | चाकण पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय<br>गु.र.नं. १४३१/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - आप्पासाहेब अंबादास जायभाय, वय - ३२ वर्षे.<br>पोलीस शिपाई,चाकण वाहतुक विभाग,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय<br>२) किशोर भगवान चौगुले, वय - ४३, खाजगी मदतनीस |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- ( पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ७,०००/- (दोन हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ०६/०९/२०२२

ठिकाण :- चाकण वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची चाकण वाहतुक विभाग येथे ताब्यात घेण्यात आलेली मोटार सायकल कारवाई न करता परत देण्यासाठी लोकसेवक यानी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांची चाकण वाहतुक विभाग येथे ताब्यात घेण्यात आलेली मोटार सायकल कारवाई न करता परत देण्यासाठी आरोपी लोकसेवक आप्पासाहेब जायभाय यानी दहा हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती सात हजार रूपये मागणी करून स्वीकारले. त्यास आरोपी क्र. २ किशोर चौगुले याने सहाय्य केले म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्यामध्ये दोघांना अटक करण्यात आली असून मा. विशेष न्यायालय, खेड येथे हजर केले असता न्यायालयाने दि. १२/०९/२०२२ रोजी पर्यत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक शितल घोगरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.